# कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि; अंकुशनगर

ता.अंबड, जि.जालना

दिनांक-१४-१२-२०१६

## -: ऊस रोपांच्या साहाय्याने बेणेमळा लागवड योजना :-

कर्मयोगी अंकुशराव टोपे समर्थ सहकारी साखर कारखाना लि;अंकुशनगर युनिट नं.१ व २ चे कार्यक्षेत्रातील (संपुर्ण अंबड व घनसावंगी आणि कारला विभाग) सर्व सभासद व बिगरसभासद ऊस उत्पादकांना कळविण्यात येते की, कारखाना गाळप क्षमतेइतका चांगल्या प्रतीचा उच्च साखर उतारा व उत्पादन देणारा परिपक्व ऊस गाळप हंगामासाठी उपलब्ध व्हावा म्हणुन कार्यक्षेत्रात को.८६०३२ व एम.एस.१०००१ या जातींचे बेणे क्षेत्र वाढविणेचे दृष्टीने मा.संचालक मंडळाने सुरु ऊस लागण हंगाम २०१६-१७ साठी खालील प्रमाणे ऊस रोपांच्या साहाय्याने बेणेमळा लागवडीचे धोरण ठरविले आहे.

| अ.क्र | तपशिल | |
|---|---|---|
| १ | ऊस लागवडीचा कालावधी | १५ डिसेंबर ते फेब्रवारी २०१७ अखेर पर्यंत |
| २ | एक एकर बेणेमळा लागवडीसाठी आवश्यक रोप (लागवड अंतर ४ फुट X २ फुट ) | ५००० नग |
| ३ | सहभागी शेतकऱ्याने एकरी ५००० रोपांसाठी प्रती रोप रु.१/- प्रमाणे भरावयाची रोख रक्कम | रु.५०००/- |
| ४ | रोप किमतीपैकी कारखान्यामार्फत एकरी ५००० को.८६०३२ रोपांसाठी प्रती रोप रु.१.५०/- प्रमाणे करावयाची वसुलपात्र गुंतवणुक | रु.७५००/- |
| ५ | रोप किमतीपैकी कारखान्यामार्फत एकरी ५००० एमएस.१०००१ रोपांसाठी प्रती रोप रु.२.५०/- प्रमाणे करावयाची वसुलपात्र गुंतवणुक | रु.१२५००/- |

तरी कार्यक्षेत्रातील सभासद व बिगरसभासद ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेंतर्गत जास्तीत-जास्त बेणेमळा लागवड करुन ऊस बेणे वृध्दीसाठी कारखान्यास सहकार्य करावे. ऊस बेणेमळा लागवड करणाऱ्या इच्छुक शेतकऱ्यांनी आपले गटातील संबंधित कृषिमदतनिस यांचेकडे विहीत नमुन्यात ऊस रोपे करारनामा भरुन घ्यावा. व आवश्यक आगाऊ रक्कम रु.५०००/- प्रती एकर त्वरीत कारखाना कार्यालयात भरावी.

**ऊस विकास अधिकारी    मुख्य शेती अधिकारी    कार्यकारी संचालक    उपाध्यक्ष    अध्यक्षा**

**व**

**मा.संचालक मंडळ**